# जनसुनावणीचे इतिवृत्त

**मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. अ बांधकाम, शिवडी फोर्ट रोड, शिवडी (पुर्व), मुंबई** येथे या प्रकल्पाचे प्रस्तावित बायोडिझेल (२ टाक्या ) व इथीनॉल (१ टाक्या ) साठवण टाक्या बांधकामाबाबतच्या पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक ०८/०६/२०१७ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर), ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) संपदा मेहता<br>जिल्हाधिकारी, मुंबई शहर. | - अध्यक्ष |
| २) मधुकर लाड<br>प्रादेशिक अधिकारी, मुंबई<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई. | - सदस्य् |
| ३) श्री. संजय भोसले<br>उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -१<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई. | - संयोजक |

जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे -

सर्वप्रथम श्री. संजय भोसले, जनसुनावणीचे आयोजक यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. ८ (V) (C) (d)- ४ शुध्दीपत्रक ६ जानेवारी २०११ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी प्रस्ताव दिनांक १९/०१/२०१७ रोजी सादर केला. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी यांनी गुरूवार, दिनांक ०८.०६.२०१७ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर **"दै. नवशक्ती"** या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच **"फ्रि प्रेस जनरल"** या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक ०६/०५/२०१७ रोजी प्रसिध्दी करण्यात आली. त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाउस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ मा. प्रधान सचिव ,पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई. प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), मप्रनि मंडळ, सायन, मुंबई, सहायक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग, महापालिका कार्यालय इमारत, डॉ. आंबेडकर रोड व जगन्नाथ भातनकर मार्ग, परळ, मुंबई-१२, प्रादेशिक अधिकारी/उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई. इ. ठिकाणी रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय

परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. संजय भोसले, यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, रहिवासी टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर संपदा शेडीड, प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले, सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. बाबतची माहिती दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या टाकीच्या बांधकामाबाबतचा नकाशा, वाहन स्थळ तसेच व्यापारी क्षेत्र आणि रहिवाशी क्षेत्र इत्यादींची माहिती सादर केली. सदर प्रकल्पाचे सध्याचे क्षेत्रफळ हे ८०.३५ हेक्टर असून ते सागर तटीय निर्बंधन क्षेत्र २ मध्ये येते. सद्य:स्थितीमध्ये या जागेवरती २८ टाक्या अस्तित्वात आहेत. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी ३ नवीन साठवण टाक्या बांधणार आहेत. सदर प्रस्तावित प्रकल्पाची किंमत अंदाजे रु.१८.०१ कोटी इतकी असेल. बांधकामाच्या वेळी एकूण १० घ.मी. इतक्या पाण्याचा वापर करण्यात येईल व त्यामधून कोणत्याही प्रकारच्या सांडपाण्याची निर्मीती होणार नाही. प्रकल्प पुर्ण होउन कार्यरत असताना पाण्याचा वापर हा ३१ घ.मी. प्रती दिन इतका असेल. तर त्यातून निर्माण होणारेसांडपाणी हे १० घ.मी. प्रती दिन इतके असेल. सदर प्रकल्पातून अत्यंत कमी प्रमाणात सांडपाणी निर्मिती होणार असल्याने सदरचे सांडपाणी हे सेप्टीक टँक मध्ये प्रक्रिया करून पुढे ते मुंबई महान ारपालिकेच्या सांडपाणी वाहिनीत विल्हेवाट केली जाईल. सदर प्रकल्पासाठी इलेक्टॉनिक मशीनव्दारे प्रवेश नियंत्रण, ट्रक नियंत्रण सिस्टीम, सीसीटीव्ही व इतर स्वयंमचलीत यंत्रणा देखरेखीसाठी बसविण्यात येणार आहे. सदर प्रकल्प उभारत असताना आवाजाची तिव्रता कमी करण्याच्या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. सादरीकरणाच्या शेवटी तांत्रिक सल्लागाराने प्रकल्पाधारकाकडून राबविण्यात येणार असलेल्या पर्यावरण विषयक उपाययोजनांची माहिती देवून सादरीकरण समाप्त केले.

तदनंतर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या रहिवाशांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने काही शंका, टिका टिप्पणी अथवा उपाययोजना बद्दलची माहिती द्यावयाची असल्यास आपण ती या ठिकाणी तोंडी अथवा लेखी स्वरूपात सादर करू शकतात. सदरची माहिती ही फक्त पर्यावरण विषयासंबंधीत असणे आवश्यक आहे. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात ये णाऱ्या उपाययोजनांच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देतील असे नमूद केले.

## प्रश्नोत्तरे

**श्री. मधुकर लाड, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**

**प्रश्न्** :- घरगुती सांडपाण्यावर घरगुती सांडपाणी प्रक्रीया संयत्रणा (STP) उभारणार आहात का ?

**उत्त्र** :- सदर जागेचे क्षेत्रफळ कमी असल्याने घरगुती सांडपाण्यावर घरगुती सांडपाणी प्रक्रीया संयत्रणा (STP) उभारण्याचा प्रयत्न् करण्यात येईल.

शेवटी जन सुनावणी समितीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपली निवेदने ही पुढे अप्पर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले व त्यांनी जनसुनावणी यशस्वी संपन्न् झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| संजय भोसले | मधुकर लाड | संपदा मेहता, |
| उपप्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, | जिल्हाधिकारी, मुंबई शहर, |
| म.प्र.नि. मंडळ, मुंबई, | म.प्र.नि. मंडळ, मुंबई | तथा |
| आयोजक/सदस्य | सदस्य् | अध्यक्ष, |
| लोकसुनावणी समिती | लोकसुनावणी समिती | लोकसुनावणी समिती. |